राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२,E- १२६६३३३/यो-११**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ

फोर्ट, मुंबई ४०० ००१

**दिनांक : १३ मे, २०२६**

वाचा :

१. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-११२३०५७/यो-११, दि.०६.०८.२०२५

२. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/यो-११, दि. ३१.१२.२०२५

३.ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/ यो-११, दि.२७.०३.२०२६

४. ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/ यो-११, दि.१४.०४.२०२६

प्रस्तावना:-

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये, ग्रामपंचायत निवडीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार तालुकास्तरावरील अत्युत्कृष्ट ३ ग्रामपंचायती जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता, जिल्हास्तरावरील अत्युत्कृष्ट प्रथम २ ग्रामपंचायती विभाग स्तरीय स्पर्धेकरिता व विभागस्तरावरील अत्युत्कृष्ट प्रथम २ ग्रामपंचायती राज्य स्तरीय स्पर्धेकरिता पात्र असतील अशी तरतुद करण्यात आली होती. तथापि, संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकान्वये, प्रत्येक स्तरावरील विजेत्या ३ ग्रामपंचायतींपैकी प्रथम क्रमांकाची १ ग्रामपंचायत पुढील स्तरावरील स्पर्धेकरिता पात्र असेल , अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सदर तरतुदींमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत निवडीची कार्यपद्धती खालीलप्रमाणे राहील :-

ग्रामपंचायतींकडून प्राप्त स्वमुल्यांकन प्रस्तावांचे तालुका स्तरावरील समितीकडून मुल्यमापन करून, तालुकास्तरावरील सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची तालुकास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल. तसेच २ ग्रामपंचायतींची विशेष पुरस्कारासाठी निवड केली जाईल.

**तालुकास्तरावरील अत्युत्कृष्ट प्रथम २ ग्रामपंचायतींचे जिल्हास्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून**, सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची जिल्हास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल.

**जिल्हास्तरावरील अत्युत्कृष्ट प्रथम २ ग्रामपंचायतींचे विभागस्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून**, सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची विभागस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल.

**विभागस्तरावरील अत्युत्कृष्ट प्रथम २ ग्रामपंचायतींचे राज्यस्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून,** सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०५१३१०५०२३१४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2026.05.13 12:37:16 +05'30'

**(प्रशांत पाटील)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु. व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्य मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य,
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई,
१०.विभागीय आयुक्त, सर्व,
११.जिल्हाधिकारी, सर्व,
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
१३. निवडनस्ती यो-११.